राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन करिता निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : निविप्र ४०१९ /प्र.क्र ४३ /क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : ०३ जून, २०१९.

<u>वाचा</u>

१. शासन निर्णय समाजकल्याण सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक - सेनिवे -१०९१ / प्र.क्र.८२/क्रीयुसे -१,दिनांक १० जून, १९९३.
२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , शासन निर्णय क्रमांक क्रीडायो २०१२/प्र. क्र.६४/१२ /क्रीयुसे-२, दि. २१ डिसेंबर, २०१२.
३.शालेय शिक्षण व क्रीडा विभाग , शासन निर्णय क्रमांक अनुवि ४९१९/(३२/१९)/अर्थसंकल्प; दि.०४ एप्रिल २०१९.
४. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा,पुणे यांचे पत्र क्र. वयोखेमानधन/निधी वितरण प्रस्ताव/२०१८-१९/ का-६/३८५; दि.०४ मे,२०१९.

<u>प्रस्तावना -</u>

राज्य / राष्ट्रीय / आंतरराराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन देण्याची योजना दि.१० जून, १९९३ च्या शासन निर्णयान्वये कार्यान्वित करण्यात आली आहे. उपरोक्त संदर्भ क्र.०२ च्या शासन निर्णयान्वये राष्ट्रीय / आंतरराराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना तसेच किताब प्राप्त कुस्तीगिरांना सुधारित दराने मासिक मानधन देण्यात येते.

सदर योजनेसाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु.५७.४२ लक्ष इतका निधी अर्थसंकल्पित असून संदर्भ क्र. ०३ च्या शासन निर्णयान्वये रु.१९.१४ लक्ष इतका निधी लेखानुदानाद्वारे मंजूर करण्यात आला आहे. सन २०१८-१९ या वर्षातील वयोवृध्द खेळाडूंना मानधन अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव संचालनालयाने शासनास सादर केला होता. यानुसार राज्य / राष्ट्रीय / आंतरराराष्ट्रीय स्तरावर अतुलनीय कामगिरी केलेल्या वयोवृध्द खेळाडूंना मानधन देण्यासाठी निधी वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

सन २०१९-२० या वर्षाकरीता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नामवंत खेळाडूंना मानधन देण्याकरिता रु.१९.१४ लक्ष इतका निधी लेखानुदानाद्वारे मंजूर करण्यात आला असून यापैकी रु.४.७४६ लक्ष (रुपये चार लाख चौऱ्याहत्तर हजार सहाशे फक्त)इतका निधी वितरीत करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्र.ई-३, २२०४-क्रीडा व युवक सेवा-१०४ क्रीडा व खेळ (०८)(०२) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केलेल्या नामवंत खेळाडूना मानधन (२२०४ १६५८), ३१ सहायक अनुदाने वेतनेतर" या लेखाशिर्षाखालील मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

I. उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आंहरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेअंतर्गत वयोवृध्द खेळाडूंना मानधन मंजूर करतांना मूळ शासन निर्णयामधील अटी व शर्ती लागू राहतील.

४. शासनाच्या सूचनांनुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत उपसंचालक/जिल्हा क्रीडा अधिकारी/लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, पुणे यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६०३१६२४०००४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: CN = Rajendra Shankarrao Pawar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = School Education and Sports Department
Date: 2019.06.03 16:31:07 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य.

२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)
११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-२)